राज्य शालेय शिक्षण विभाग ॲक्शन मोडवर

राज्यातील शाळांमधील परिस्थितीचा आढावा घेतला | **विविध उपाययोजनांच्या काटेकोर अंमलबजावणीचे निर्देश** | **सूचनेचे पालन न करणाऱ्या शाळांची मान्यता रद्द होणार** | **मुख्याधापकांमार्फत आठवड्यातून किमान तीन वेळा फुटेजची तपासणी**

पुणे : शालेय विद्यार्थ्यांमधील वाढत्या अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी आणि विद्यार्थी सुरक्षेची काटेकोरपणे अंमलबजावणी राज्याचा शालेय शिक्षण विभाग ॲक्शन मोडवर आला आहे. शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती करताना घ्यावयाची काळजी, तक्रार पेट्या, सखी सावित्री समितीच्या तरतुदी, विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन आणि राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समितीचे गठण अशा विविध उपाययोजनांच्या काटेकोर अंमलबजावणीला शिक्षण विभागाने प्राधान्य दिले आहे.

बदलापूर येथे दोन चिमुकल्यांवर लैगिंक अत्याचाराच्या घटनेनंतर राज्यभरात संतापाची लाट पसरली आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून बदलापूर घटनेची शिक्षण विभागाने गंभीर दखल घेतली आहे. राज्यातील सर्व शाळांमधील परिस्थितीचा आढावा घेण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात आला आहे. बदलापूरच्या घटनेत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तवनातून प्रकार घडल्याचे समोर आले आहे. तसेच विविध सूचनांकडे शाळा प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले. त्या अनुषंगाने शिक्षण विभागाकडून काही उपाययोजना करण्यात आल्या असून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांकरिता शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक महिना कालावधीत शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनेचे पालन न करणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करणे अथवा अनुदान रोखण्याची कारवाई केली जाणार आहे. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत, अशा शाळांमध्ये कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजनेत शिक्षण विभागाशी संबंधित योजनांची पुनर्रचना करून त्यासाठी किमान ५ टक्के निधी राखीव ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. केवळ कॅमेरे न बसविता त्याचे फुटेज तपासणे देखील आवश्यक आहे. शाळांच्या मुख्याधापकांनी आठवड्यातून किमान तीन वेळा फुटेजची तपासणी करायची आहे. फुटेजमध्ये काही आक्षेपार्ह बाबी आढळल्यास स्थानिक पोलीस प्रशासनाशी संपर्क साधण्याची जबाबदारी मुख्याध्यापकाची राहील.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना काळजी घेणे व त्याच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे. याकरिता कर्मचाऱ्याची नेमणूक करतेवेळी त्या व्यक्तीच्या पार्श्वभूमीची काटेकोर तपासणी शाळा व्यवस्थापनाला करावी लागणार आहे. नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलिसांकडून घ्यावा लागणार आहे.

राज्यस्तरीय आढावा समिती गठीत

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शिक्षण विभागाने राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती गठीत केली आहे. या समितीत शिक्षण आयुक्त हे अध्यक्ष तर प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, प्राथमिक शिक्षण संचालक, माध्यमिक शिक्षण संचालक आणि शिक्षण विभागातील दोन महिला अधिकारी हे सदस्य म्हणून काम पाहतील. तसेच शिक्षण आयुक्त कार्यालयातील सहसंचालक हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

निवडक

जय हिंद ग्रुपतर्फे वृक्षारोपण

अंबाजोगाई : जय हिंद ग्रुपच्या वतीने सद्भावना दिनानिमित्ताने विविध ठिकाणी वृक्षारोपण करून तरुणांनी वृक्ष लागवड करून वृक्षापोटी सद्भाव जागृत करावा. आज शुद्ध हवा व ऑक्सिजनची मानवाला गरज आहे. त्यासाठी वृक्ष लागवड करून वृक्षाप्रती सद्भावना चांगली भावना जागृत करावी असे आवाहन मेजर एस. पी. कुलकर्णी यांनी केले. आज वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे ती थांबवून वृक्षाचे संगोपन करणे गरजेचे आहे असे या कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलकर्णी म्हणाले. प्रमुख पाहुणे भागवत मसणे यांनी कविताच्या माध्यमातून मनामनात तरुणांनी वृक्षाचा विचार करावा. सद्भावनेचा अर्थ प्रेम आदरभाव. हाच आदरभाव वृक्षांप्रती करावा. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र मठपती, सूत्रसंचालन दत्ता बनसोडे तर आभार प्रदर्शन रवींद्र जोशी यांनी केले या वृक्षारोपण कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी श्रमदानातून खड्डे खोदले. त्यात सुरज राठोड, सुंदर मुंडे, अविनाश मळेकर यांनी सहभाग घेतला.

नाशिक येथे वृक्षारोपण मोहीम

नाशिक : मंडळ कार्यालय नाशिकने आपल्या शाखा वेद मंदिर परिसरात भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीने साजरा केला. ध्वजारोहण समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रेरणादायी भाषणांनी हा कार्यक्रम झाला. यावेळी वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. राकेश कुमार, मंडळ प्रमुख, नाशिक यांनी राष्ट्रध्वज फडकावला, त्यानंतर राष्ट्रगीत सादर केले.

आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व आणि स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या बलिदानावर भर दिला. त्यांनी कर्मचाऱ्यांना राष्ट्र उभारणीसाठी आणि लोकशाहीच्या मुल्यांचे पालन करण्यासाठी कार्य करण्यास प्रोत्साहित केले.

बँकेने सुरू केलेल्या PNB PALAASH २.० मोहिमेंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये प्रत्येक कर्मचारी २ रोपे लावणार आहे. १४ जिल्ह्यांमध्ये ५५० कर्मचाऱ्यांना ११०० रोपांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात कर्मचाऱ्यांसह त्यांचे कुटुंबीय देखील सहभागी झाले होते.

उरणच्या पाच ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त

उरण : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ पर्यंत भारत क्षयरोग मुक्त करण्याचा संकल्प केला आहे. त्यानुसार महाराष्ट्राला क्षयरोग मुक्त करण्यासाठी आरोग्य विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात आरोग्य विभागाकडून क्षयरोग मुक्त पंचायत अभियान हाती घेतले आहे. त्यानुसार देशातील एक हजार पंचायतमध्ये क्षयरोग मुक्त अभियान राबविण्यात येत आहे. क्षयरोग मुक्त ग्रामपंचायती म्हणून उरण तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. बुधवार दिनांक २१ रोजी पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात सदरचा सोहळा पार पडला.

दत्त दिगंबर को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई
नोंदणी क्र. बी.ओ.एम./डब्लू.पी./आर.एस.आर./(सी.आर.)/१११६ सन १९८७-८८

वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस

या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि, संस्थेची छत्तीसावी वार्षीक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक ०५.०९.२०२४ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता मराठा मंडळ हॉल, साठे मैदान, भगतसिंग नगर नं. १ च्या समोर, लिंक रोड गोरेगाव (पश्चिम), मुंबई ४००१०४. येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

संचालक मंडळाच्या वतीने सही
ठिकाण : मुंबई श्री. लक्ष्मण वि. निकम
दिनांक : २०.०८.२०२४ (मुख्य कार्यकारी अधिकारी)

जाहीर नोटीस

सर्व सबंधिताना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन - गाव मौजे सायवन, मौजे सायवन, तालुका - वसई, जिल्हा व जिल्हा परिषद - पालघर यांचे हद्दीत व मे. दुय्यम निबंधक वसई यांचे अधिकार क्षेत्रातील स.नं./हि.नं. १०३/अ/३ (जुना १०३/अ/४), क्षेत्र ०-३६-०० (हे.आर.चौ.मी.) पो. ख. ०-२१-०० (हे.आर.चौ.मी.), आकर ०.२२ (रु. पैसे.) यापुढे संक्षिप्तपणे "विषयांकित मिळकत" असे संबोधण्यात येत आहे. माझे अशील श्री. रामजी राम मिलन कनोजिया हे विषयांकित मिळकतीवरील मालकी हक्क खरेदी करण्यास इच्छुक आहेत. तरीही, कोणत्याही व्यक्तीस/संस्थेस विषयांकित मिळकत किंवा त्याच्या भागाविरुध्द विक्री, अदलाबदल, गहाण, भेट, विश्वस्त, वारसा, भाडेपट्टा, कब्जा, कुळवहिवाट, प्रभार, धारणाधिकार किंवा याशिवाय कसेहीच्या मार्गे कोणताही दावा असल्यास किंवा सदर मिळकती त्याच्या संदर्भातील मालकी हक्काच्या हस्तांतरणाच्या विरोधात कोणताही आक्षेप किंवा त्याच्या संदर्भातील मालकी हक्काविरुध्द आक्षेप किंवा दावा किंवा काही असल्यास त्याची सूचना निम्नस्वाक्षरीकारांना खालील नमूद पत्यावर सदर सूचना प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कळविणे, कसूर केल्यास दावा किंवा आक्षेप काही असल्यास ते त्यागित करण्यात येतील आणि आमचे अशील त्यासंदर्भातील आवश्यक दस्तावेज निष्पादित करतील, याची नोंद घ्यावी.

माझ्या अशिलातर्फे
ॲड. नेहा नितीन गावडे
कार्यालय ए/२०४, अमरनाथ बिल्डींग, सुराम पार्क को. ऑप. सोसा., जीवदानी रोड, विरार (पूर्व), ता. वसई, पालघर - ४०१ ३०५.

कर्ज वसुली न्यायाधिकरण-१ मुंबई
(भारत सरकार, वित्त मंत्रालय)
२रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४००००५
(५वा मजला, सिंदिया हाऊस, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१)
ओ. ए. क्र. २६९ सन २०२४ **परि -१२**

पंजाब नॅशनल बँक ...अर्जदार
विरुद्ध
सुनिलकुमार मोहनन अक्करकरन आणि अन्य ....प्रतिवादी
प्रति,

प्रतिवादी क्र. १	सुनीलकुमार मोहनन अक्करकरन, फ्लॅट क्र. १०१, श्री साई विहार सीएचएस लि, पी ॲन्ड टी कॉलनी, तरटे प्लाझा जवळ, गांधीनगर, डोंबिवली पूर्व, ठाणे, महाराष्ट्र ४२१२०१ येथे सुद्धा ए-१०१, अंकित सीएचएस लि, कस्तुर प्लाझा समोर, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व, डोंबिवली महाराष्ट्र ४२१२०१
प्रतिवादी क्र. २	सुधीरकुमार मोहनन अक्करकरन फ्लॅट क्र. १०१, श्री साई विहार सीएचएस लि, पी ॲन्ड टी कॉलनी, तरटे प्लाझा जवळ, गांधीनगर, डोंबिवली पूर्व, ठाणे, महाराष्ट्र ४२१२०१ येथे सुद्धा ए-१०१, अंकित सीएचएस लि, कस्तुर प्लाझा समोर, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व, डोंबिवली महाराष्ट्र ४२१२०१

समन्स

१. ज्याअर्थी, वरील नमूद **ओए/२६९/२०२४** नामदार पिठासन अधिकारी/ प्रबंधकांसमोर **०२/०८/२०२४** रोजी सूचीबद्ध केला होता.
२. ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. २,००,०५,७१७.९०/-**च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओए) समन्स/सूचना जारी केली.
३. ज्याअर्थी साधारण स्वरुपात समन्स/सूचनेची बजावणी परिणामकारक झालेली नाही आणि ज्याअर्थी सन्माननिय न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे.
४. ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.
(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु क्रमांक ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
५. तुम्हाला **२६/११/२०२४ रोजी दुपारी १२:०० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व प्रबंधकांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **०९ ऑगस्ट, २०२४** रोजी दिले.

सही/-
प्रबंधक,
कर्ज वसुली न्यायाधिकरण - १, मुंबई

जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की आमचे अशिल मे. मुथूट फायनान्स लि. यांनी **23rd August 2024** रोजी अनुसूचित केलेला प्रस्तावित सार्वजनिक लिलाव (**तारण दागिन्यांचा**) काही अपरिहार्य परिस्थितींमुळे, पुढे ढकलण्यात आला आहे आणि आता तो **18th September 2024** ला अनुसूचित करण्यात आला आहे. सार्वजनिक लिलावाची जाग व वेळ तीच राहिली जी संबंधित कर्जदारांना आधीच सूचित करण्यात आली आहे. कोणत्याही स्पष्टीकरणासाठी, स्वारस्य असलेल्या व्यक्ती आमच्या अशिलांच्या संबंधित शाखा कार्यालयाशी संपर्क साधू शकतात.
सूचना: बनावट/कमी दर्जाच्या दागिन्यांच्या लिलाव वेळापत्रकात कोणताही बदल होणार नाही.
कोहली ॲंड सोबती ॲडवोकेट्स, ए 59ए,
पहिला मजला, लाजपत नगर-II, नवी दिल्ली - 110024
ग्राहक आमच्या अशिलाकडील थकबाकी भरून, नियोजित लिलाव दिनांकाच्या पूर्वी त्यांचे तारण ठेवलेले दागिने सोडवून घेऊ शकतात. अधिक माहिती साठी संपर्क साधा **recoverynorth@muthootgroup.com** कॉल करा: **7834886464, 7994452461.**

जाहीर सूचना

सर्वसाधारण जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की आमचे अशिल मे. मुथूट फायनान्स लि. यांनी **22nd August 2024** रोजी अनुसूचित केलेला प्रस्तावित सार्वजनिक लिलाव (**तारण दागिन्यांचा**) काही अपरिहार्य परिस्थितींमुळे, पुढे ढकलण्यात आला आहे आणि आता तो **16th September 2024** ला अनुसूचित करण्यात आला आहे. सार्वजनिक लिलावाची जाग व वेळ तीच राहिली जी संबंधित कर्जदारांना आधीच सूचित करण्यात आली आहे. कोणत्याही स्पष्टीकरणासाठी, स्वारस्य असलेल्या व्यक्ती आमच्या अशिलांच्या संबंधित शाखा कार्यालयाशी संपर्क साधू शकतात.
सूचना: बनावट/कमी दर्जाच्या दागिन्यांच्या लिलाव वेळापत्रकात कोणताही बदल होणार नाही.
कोहली ॲंड सोबती ॲडवोकेट्स, ए 59ए,
पहिला मजला, लाजपत नगर-II, नवी दिल्ली - 110024
ग्राहक आमच्या अशिलाकडील थकबाकी भरून, नियोजित लिलाव दिनांकाच्या पूर्वी त्यांचे तारण ठेवलेले दागिने सोडवून घेऊ शकतात. अधिक माहिती साठी संपर्क साधा **recoverynorth@muthootgroup.com** कॉल करा: **7834886464, 7994452461.**

GTL

जीटीएल लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ''ग्लोबल व्हिजन'', इलेक्ट्रॉनिक सदन-।।, एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०, महाराष्ट्र, भारत.
ई-मेल: gtlshares@gtllimited.com; **वेबसाइट:** www.gtllimited.com
सीआयएन: L40300MH1987PLC045657

कंपनीची ३६वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) आणि ई-मतदानाच्या माहितीबाबतची सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की, जीटील लिमिटेडच्या सभासदांची छत्तीसावी (३६वी) वार्षिक सर्वसाधारण सभा **गुरूवार, १२ सप्टेंबर २०२४ ला दुपार २:०० वाजता (भाप्रवे)** व्हिडिओ कॉन्फरन्स (''व्हीसी'')/अन्य दृकश्राव्य माध्यम (''ओएव्हीएम'') द्वारे होत असून कंपनी व्यवहार मंत्रालय (''**एमसीए**''), भारत सरकार, यांचे २५ सप्टेंबर २०२३ चे सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०९/२०२३ आणि सिक्युरिटीज ॲंड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (''**सेबी**'') यांचे ७ ऑक्टोबर २०२३ चे परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/पीओडी-२/पी/सीआयआर/२०२३/१६७ आणि सेबीने जारी केलेली अन्य परिपत्रके (''एकत्रितपणे परिपत्रके'' असा उल्लेख) याच्या अनुपालनानुसार सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय सामायिक स्थळी होणार आहे. वर उल्लेखित एजीएमचे स्थळ हे कंपनीच नोंदणीकृत कार्यालय ग्लोबल व्हिजन, इलेक्ट्रॉनिक सदन-।।, एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०, महाराष्ट्र, भारत मानले जाईल.

परिपत्रकांच्या अनुपालनानुसार ३६व्या एजीएमच्या आयोजनाबाबतची १४ ऑगस्ट २०२४ रोजीची इलेक्ट्रॉनिक्स स्वरूपातील नोटीस (आवश्यक असलेल्या सर्व माहितीसह), सभेच्या दिवशी होणाऱ्या सामान्य तसेच विशेष कामकाजाच्या टिप्पणीसह ३१ मार्च २०२४ ला संपलेल्या आर्थिक वर्षासाठी स्वतंत्रपणे लेखापरिक्षित केलेल्या कंपनीच्या आर्थिक ताळेबंदाबरोबरच वित्तीय कामगिरी, संचालकांचा अहवाल, लेखापरिक्षकांचा अहवाल, कंपनी कारभार अहवाल आणि व्यवस्थापनाची चर्चा आणि विश्लेषण दस्तावेज यांच्यासह आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक अहवाल कंपनी तसेच संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटसकडे आपल्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी केलेल्या सर्व सभासदांना त्यांच्या ई-मेल पत्त्यांवर दस्तावेज वितरित करण्यात आलेले आहे. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कागदपत्रांच्या वितरणाचे हे काम २१ सप्टेंबर २०२४ रोजी पुर्ण झालेले आहे.

एजीएमची नोटीस आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या वार्षिक अहवालातील अन्य विभागांची माहिती कंपनीचे संकेतस्थळ www.gtllimited.com तसेच कंपनीचे समभाग नोंदणीकृत असलेल्या शेअरबाजारांच्या संकेतस्थळांवर म्हणजेच बीएसई www.bseindia.com आणि एनएसई www.nseindia.com यांच्यासह सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) चे www.evotingindia.com संकेतस्थळ यावर उपलब्ध आहे.

दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या ठिकाणी ई-मतदान

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदीनुसार तसेच कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम २० मधील दूरस्ती तसेच सेबी (नोंदणी उत्तरदायित्व आणि माहिती प्रकटीकरणाची आवश्यकता) नियमावली, २०१४ मधील नियम ४४ तसेच अन्य इतर कोणत्याही लागू असलेल्या तरतुदींच्या वाचनासह ३६ व्या एजीएमसंदर्भात आपल्या मतदानाचा हक्क बजावण्यासाठी कंपनी सभासदांना दूरस्थ ई-मतदानाच्या पर्यायाची सुविधा देत असून हे सर्व कामकाज सीडीएसएलने पुरविलेल्या ई-मतदान सेवेद्वारे पुर्ण केले जाऊ शकते. दूरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया सोमवार, ०९ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी नऊ वाजता (भा.प्र.वे.) सुरू होऊन बुधवार, ११ सप्टेंबर, २०२४ ला सायंकाळी पाच वाजता (भा.प्र.वे.) संपणार आहे. गुरूवार, ०५ सप्टेंबर २०२४ या अंतिम मुदतीपर्यंत म्हणजेच कट-ऑफ मुदतीपर्यंत भौतिक अथवा डिमटेरियलाईझड स्वरूपात समभाग धारण करणारे समभागधारक या कालावधीदरम्यात इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आपले मतदान करू शकतील. मतदानाची निर्धारित वेळ संपल्यानंतर दूरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया सीडीएसएलकडून खंडीत केली जाणार आहे.

एजीएम नोटीसच्या वितरणानंतर समभाग विकत घेतलेली आणि कंपनीचा सभासद झालेली तसेच कट-ऑफ तारखेपर्यंत समभाग धारण करणारी व्यक्ती एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या ई-मतदानाच्या पद्धतीचे अनुकरण करू शकते.

दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून आपल्या मतदानाचा हक्क न बजावलेल्या सभासदांसाठी एजीएमदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे मतदान करण्याची सुविधा पुरविली जाणार आहे. एजीएमच्या आयोजनापुर्वी दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान केलेले सभासद एजीएमला उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकारी मिळणार नाही. सभासद सुचीत किंवा डिपॉझिटरीजच्या लाभधारक मालकांच्या रजिस्टरमध्ये निर्धारित केलेल्या अंतिम तारखेपर्यंत नाव समाविष्ट असलेल्या व्यक्तीच दूरस्थ ई-मतदानाच्या सुविधेसाठी किंवा एजीएमदरम्यान ई-मतदानाचा अधिकारी बजावण्यास पात्र राहतील.

नोंदणीकृत कंपन्यांकडून ई-मतदान सुविधा पुरविण्यासंदर्भात सेबीने ९ डिसेंबर २०२० ला निगमित केलेल्या परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी/सीआयआर/पी/२०२०/२४२ नुसार, डिमॅट खातेधारक आपल्या लॉगिन ओळखपत्रा आधारे त्यांच्या संबंधित डिमॅट खाते अथवा डिपॉझिटरीजची संकेतस्थळे अथवा डिपॉझिटरी पार्टीसिपंटसच्या माध्यमातून आपले मतदान करू शकतात. त्यासाठी त्यांना ई-मतदान सेवा पुरविणाऱ्या घटकांकडे (ईएसपी) पुन्हा नोंदणीची गरज नाही आणि याबाबतची पद्धत एजीएमच्या नोटीसमध्ये सविस्तरपणे स्पष्ट करण्यात आलेली आहे. एजीएमची नोटीस आणि कागदपत्रे कंपनीच्या www.gtllimited.com संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

एजीएममधील सहभाग आणि ई-मतदान सुविधेच्या माध्यमातून ई-मतदान करण्याच्या प्रक्रियेसंदर्भात तुम्हाला काही शंका किंवा समस्या असल्यास तुम्ही या संकेतस्थळावरील मदत विभागात (हेल्प सेक्शन) उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न www.evotingindia.com आणि ई-मतदान संदर्भपुस्तिकेचा आधार घेऊ शकतात किंवी helpdesk.evoting@cdslindia.com या पत्यावर ई-मेल पाठवू शकतात किंवा टोल फ्री नं. १८०० २१ ०९९११ वर संपर्क साधू शकतात.

इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धत सुविधेसंदर्भात असलेल्या सर्व समस्यांबाबत श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेळ (पुर्व), मुंबई-४०००१३, महाराष्ट्र यांच्याशी संपर्क साधू शकता किंवा helpdesk.evoting@cdslindia.com या पत्यावर ई-मेल पाठवावा किंवा १८०० २१ ०९९११ या क्रमांकावर संपर्क करावा.

कंपनीचे रजिष्ट्रार आणि समभाग हस्तांतर प्रतिनिधी बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी संपर्क साधण्याचा पर्याय उपलब्ध आहे. त्यांचे कार्यालय ऑफिस नं. एस६-२, ६वा मजला, पिनॅकल बिझनेस पार्क, अहुरा सेंटरच्या पुढे, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३, महाराष्ट्र, भारत **दूरध्वनी:** +९१-२२-६२६३८२०० **एक्स:** २२१-२२२ **फॅक्स:** +९१-२२-६२६३८२९९ महाराष्ट्र या पत्त्यावर असून त्यांच्या ई-मेल पत्ता investor@bigshareonline.com सभासद संपर्क साधू शकतात.

एमसीए आणि सेबीच्या लागू असलेल्या परिपत्रकांच्या अनुपालनानुसार कंपनीच्या सभासदांच्या माहिती तसेच लाभासाठी ही नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे.

टीप:
१. एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकांना अनुसरून ३६वी एजीएम व्हीसी/ओएव्हीएम माध्यमातून आयोजित करण्यात आलेली असल्याने सभासदांची व्यक्तिश: उपस्थित राहण्याची पद्धत स्थगित करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर एजीएमसाठी सभासदांकडून त्रयस्थ प्रतिनिधी (प्रॉक्झीज) नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नसल्याने प्रॉक्झी फॉर्म, उपस्थिती पावती आणि सभा स्थळाचा नकाशा (रूट मॅप) नोटीसला जोडलेले नाहीत.
२. भौतिक स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सभासदांना विनंती केली जाते की त्यांनी वर नमूद केल्याप्रामणे रजिस्ट्रार आणि शेअर हस्तांतर प्रतिनिधीला त्यांच्या पत्त्यात बदल असल्यास त्वरित माहिती कळवावी. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात समभाग धारण करणारे सभासद असे तपशील त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट्सकडे अद्ययावत करू शकतात.

जीटीएल लिमिटेडसाठी
स्वाक्षरी
स्थळ : नवी मुंबई **दिपक अ. केळुसकर**
दिनांक : २१ ऑगस्ट, २०२४ **कंपनी सचिव**

वकील: नेपोलियन तुस्कानो
जाहीर नोटीस
वसई येथील मा. श्री. जी.जे. श्रीसुंदर, दिवाणी न्यायाधिश, व.स्तर, वसई यांच्या न्यायालयात
पु. ता. २६/०८/२०२४
चौ.अ.क्र.६१/२०२४
नि.क्र. ०५

1.MR. LALMANI RAMVILAS SHUKLA
2. SMT VIDYA LALMANI SHUKLA,
A/303, MaxAvenue Apartment, Oswal Nagar, near U.S. English School Nallasopara (E)- 401209
Vs **... Applicant**
No One. **... Respondent**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी दिनांक १६/०२/२०२४ रोजी **Shri. DEVIPRASAD LALMANI SHUKLA** हे दि.२७/०६/२०२० रोजी मयत झाले असून त्यांच्या मालमत्तेसंबंधी वारस दाखला (सक्सेशन प्रमाणपत्र) मिळणेसाठी या न्यायालयात **चौकशी अर्ज क्रमांक ६१/२०२४** दाखल केला आहे.

Schedule of Property

के.बी.भाभा रूग्णालय, बांद्रा प. येथे श्री. देवीदास शुक्ला, लिपीक म्हणून कार्यरत होते. दि. 27/06/2020 रोजी त्यांचा अकस्मात मृत्यू झालेला आहे. कर्मचा-यांचे दावे निकाली काढण्यासाठी Succestion certificate ची आवश्यकता आहे. त्यांच्या खाती पुढील प्रमाणे रजेची, पी.एफ. व ग्रॅच्युइटी अशी अंदाजित एकूण रक्कम रू.11,89,096/- इतकी आहे.

ज्याअर्थी सक्सेशन प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात चौ.अर्ज क्रमांक **६१/२०२४** दाखल केलेला आहे. ज्या कोणी इसमास त्यांचे कायदेशीर वारस, हक्क हितसंबंध किंवा हरकत असेल त्यांनी हया न्यायालयांत **दिनांक २६/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून एक महिन्याचे आत लेखी हरकत दाखल करावी.** सदरहू सक्सेशन प्रमाणपत्र देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत न आल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्रे घेऊन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

आज दि.१९/०८/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावरुन,
Seal
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर वसई

PUBLIC NOTICE

Late Mrs. Khatija Mohammed Qasim Dalnari was exclusive owner of Flat No. 905, Hill Park A-3 Tower Co-operative Housing Society Ltd. Situated at **Hill Park** Complex, Near Agrawal Industrial Estate, Captain Suresh Samant Marg, Jogeshwari (West), Mumbai